अत्यंत महत्त्वाचे

# University of Mumbai


सांख्यिकी कक्ष
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट आवार,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई - ४०० ०३२.

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com


**No. UDSTAT/ICD/2019-20/ 55 of 2019**

दिनांक : २२ ऑगस्ट २०१९.

प्रति,
प्राचार्य/संचालक,

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ आणि २०१९–२०या वर्षाकरिता संचालक, मानव संसाधन विकास मंत्रालय,भारत सरकार, नवी दिल्ली यांचा AISHE (www.aishe.gov.in), संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, यांचा MIS (dhemis.maharashtra.gov.in) आणि मुंबई विद्यापीठ विकसित यांचा Students on Roll (www.eoffice .mu.ac.in) याबाबतच्या सर्वेक्षणात्मक कार्यक्रमाची प्रति शैक्षणिक वर्षाप्रमाणे online माहिती भरणे अत्यावश्यक आहे. त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक यानात्याने आपणांस अवगत करण्यात येते की, डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, यांच्या आदेशानुसार आपल्या महाविद्यालयीन उल्लेखित केलेल्या शैक्षणिक वर्षाप्रमाणे किंवा त्या अगोदरच्या शैक्षणिक वर्षाप्रमाणे AISHE Portal वर अद्यापपर्यंत नाव नोंदणी (Registration) करून घेतलेली नाही, यांनी नाव नोंदणी (Registration) करून घेणे अत्यंत आवश्यक व अनिवार्य आहे. त्याचबरोबर नाव नोंदणी (Registration) करून घेण्यास विलंब का झाला ? याबाबतचा लेखी खुलासा सादर करण्यास संचालनालयामार्फत सूचित करण्यात आलेले आहे. **संबंधित नाव नोंदणीचे (Registration) कामकाज दिनांक १६ ऑगस्ट २०१९ पासून सुरू झालेले आहे.**

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील संबंधित सर्वेक्षणात्मक कामकाजासाठी एक नोडल अधिकारी या पदासाठी नेमणूक करण्यात यावी, कारण सर्वेक्षणात्मक कार्यक्रमांतर्गत असलेल्या Web Portal वर महाविद्यालयाचे नाव समाविष्ट करण्यासाठी नेमूण दिलेल्या अधिका-याचे भ्रमणध्वनी क्रमांक, महाविद्यालयीन दुरध्वनी क्रमांक, रजिस्टर्ड ई-मेल आयडी व तसेच शासन निर्णय व सलंग्निकरण (Affiliation Letter) इ. गोष्टी नाव नोंदणी (Registration) करण्यासाठी सुलभ होईल.

**उपरोल्लेखित संक्षिप्तबाब लक्षात घेता आपणांस पुनःश्च विदीत करण्यात येते कि, सदरचे AISHE, MIS व Students on Roll या सर्वेक्षणात्मक कार्यक्रमासाठी आपल्या महाविद्यालयाचे नाव नोंदणी (Registration) करून घेण्यासाठी सहायक कुलसचिव/अधिक्षक, सांख्यिकी कक्ष, खोली क्र. २०२, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे दिनांक २८ ऑगस्ट २०१९ पर्यंत थेट संपर्क साधवा.**

आपला विश्वासू,

दिपक वि. मोरे
नोडल अधिकारी
AISHE/ MIS Cell

Scanned with CamScanner